Mumbai Mitra
Ladies first in social entrepeuners awards
Edition: Mumbai Date: 09/11/2013 Page no: 5 Clip size: H: 13 cm / W: 8 cm

# सोशल आंत्रप्रिन्युअर ऑफ द इयर इंडिया अॅवॉर्डमध्ये महिलांची बाजी

**मुंबई** : एसईओवाय इंडिया अॅवॉर्ड आयोजित करणाऱ्या द ज्युबिलण्ट भारतीय फाऊंडेशनने सामाजिक उद्योजकतेच्या क्षेत्रातल्या श्वॅब फाऊंडेशनच्या सहकार्याने सोशल आंत्रप्रिन्युअर ऑफ द इयर (एसईओवाय) इंडिया अॅवॉर्ड २०१३२च्या अंतिम फेरीतील उमेदवारांची घोषणा केली.

ते पुढीलप्रमाणे आहेत- ब्रेकथ्रू ट्रस्ट (संस्थापिका- मल्लिका दत्त), माणदेशी महिला बँक आणि माणदेशी फाऊंडेशन (संस्थापिका- चेतना विजय सिन्हा), ऑपरेशन आशा (संस्थापिका- डॉ. शेली बत्रा) आणि युवा परिवर्तन/ खेरवाडी सोशल वेल्फेअर असोसिएशन (मृणालिनी खेर आणि किशोर खेर प्रवर्तित) आहेत. परीक्षक मंडळ विजेत्यांची निवड करील आणि ११ नोव्हेंबर २०१३ रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार दिला जाईल.

एसईओवाय इंडिया अॅवॉर्ड २०१३ च्या अंतिम फेरीतले उमेदवार आरोग्य, आर्थिक न्याय, मानवी हक्क आणि रोजगारक्षमता आणि कौशल्यनिर्मिती अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असून आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत, असे ज्युबिलण्ट लाइफ सायन्सेसचे अध्यक्ष आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्याम एस. भारती आणि सहअध्यक्ष आणि हरी एस. भारतीय म्हणाले.